वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि.३० डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## शिव-शाहु-फुले-आंबेडकर बीड शहर विकास आघाडी स्थापन

# फारूक पटेल यांच्यावर पुन्हा गटनेतेपदाची जबाबदारी



बीड (दिव्य न्युज):- बीड नगर पालिका निवडणूक निकालात सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) आणि मित्र पक्षाने अखेर आज शिव-शाहू-फुले-आंबेडकर बीड शहर विकास आघाडी या नावाने गट स्थापन केला आहे. गटनेते पदी जेष्ठ आणि अनुभवी नगरसेवक फारूक पटेल यांची निवड करण्यात आली आहे. या संदर्भात आज दुपारी उशिरा गट स्थापनेसह गटनेता निवडीचे पत्र जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी आ.विजयसिंह पंडित, पक्षनिरीक्षक माजी आ.संजय दौंड, नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, जिल्हाध्यक्ष राजेश्वरआबा चव्हाण, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, गटनेते फारूक पटेल, शेख मुजीब, शेख निजाम यांच्यासह सर्व नगरसेवक, मित्रपक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.



### शरद पवारांनी भाजपासोबत जाण्याचं पहिलं पाऊल टाकलं-ॲड.आंबेडकर



गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार याची चर्चा सुरू असतानाच महानगरपालिका निवडणुकींमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी थेट पिंपरी चिंचवड आणि पुण्यामध्ये दोन राष्ट्रवादी एकत्र करण्याची किमया केली. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी विलीन करून सत्तेत सामील होण्याची चर्चा आणखी रंगली आहे. इतकेच नव्हे तर केंद्रामध्ये सुप्रिया सुळे मंत्री होतील आणि राज्यांमध्ये अजित पवार यांना एकाधिकार दिले जातील आणि शरद पवार खासदारकीचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर सक्रीय राजकारणापासून दूर होतील अशी चर्चाही राज्याच्या राजकारणात मोठ्या प्रमाणात रंगली आहे. दरम्यान, काल झालेल्या बारामतीच्या कार्यक्रमामध्ये काका पुतण्या आणि सुप्रिया सुळे यांची जवळीक नव्याने दिसून आली. या सर्व पोर्शभूमीवर आता वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सुद्धा खोचक टोला लगावला आहे. प्रकाश आंबेडकर यांनी काका आणि पुतण्या एक आले म्हणजे त्यांचं विलीनीकरण झालं आहे. अजित पवारांच्या साथीने शरद पवारांनी भाजपसोबत जाण्याचे पहिले पाऊल टाकलं असल्याचं भाकित वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी वर्तवलं आहे. शरद पवार जे बोलतात त्याच्या उलट कृती करतात हे त्यांच्याबद्दल माझं मापदंड अगदी तंतोतंत खरं ठरल्याचा उपरोधिक टोलाही प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी लगावला.

# महापालिकेच्या राजकारणात भरला तिकिटाचा बाजार

Email.- dailydivyawarta@Gmail.com
Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## कोणत्याच पक्षाच्या नेत्यांनी निष्ठा शिल्लक ठेवली नाही

### सकाळी एका पक्षात आणि संध्याकाळी दुसऱ्या पक्षाची उमेदवारी

बीड (दिव्य न्युज):- महानगर पालिका निवडणुकीच्या रणधुळीमध्ये राज्याच्या महानगरांध्ये राजकारणाचा अक्षरशः बाजार भरला आहे. वृत्तवाहिन्यांवरील बातम्या, वर्तानपत्रांधील विश्लेषण आणि सोशल मिडियावरील बातम्या पाहिल्यानंतर एखाद्या गावच्या बैलाचा बाजार बरा असतो अशी परिस्थिती राज्याच्या राजकारणात आणि विशेषतः महानगर पालिका निवडणुकीत झाली आहे. मुंबईसारख्या शहरांध्ये उमेदवार देतांना ▶▶ पान २ वर

### होळच्या कोलंबस स्वस्त धान्य दुकानाची १०० टक्के अनामत जप्त, ५ हजार दंड

**जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांची कारवाई**

**४४ क्विंटल धान्य पकडल्याचे प्रकरण**

**धारूर पोलिस गुन्हा कधी नोंदवणार?**



केज, (दिव्य न्युज):- तालुक्यातील होळ येथील कोलंबस मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेच्या स्वस्त धान्य दुकानाच्या धान्याचा काळाबाजार उघडकीस आला होता. या दुकानाचे धान्य धारूरमध्ये पोलिसांनी दि.१४ जुलै रोजी पकडले होते. त्यानंतर केज तहसीलच्या पुरवठा विभागाने तपासणी केली असता धान्याची तफावत आढळून आली होती. या अहवालावरून जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी स्वस्त धान्य दुकानाची १०० टक्के अनामत जप्त, ५ हजार रुपये दंड आणि ५०० रुपयांच्या बाँडवर बंधपत्र घेण्याचे आदेश सोमवारी (दि.२९) दिले आहेत.होळ येथील कोलंबस मत्स्य व्यवसाय सहकारी ▶▶ पान २ वर

## १५-१५ लाख रुपयांना तिकीट विकलं प्रामाणिक कार्यकर्त्यांना गद्दार ठरवलं

### इम्तियाज जलील यांच्याविरोधात एमआयएममध्ये उद्रेक



औरंगाबाद, (दिव्य न्युज):- शिवसेना-भाजप पाठोपाठ एमआयएम पक्षातही मोठ्या प्रमाणात नाराजीनाट्य समोर आले आहे. एमआयएमचे नासेर सिद्दीकी व इतर कार्यकर्त्यांनी इम्तियाज जलील यांच्यावर पक्ष विकायला काढल्याचा आरोप केला आहे. १५-१५ लाखांत तिकीटं विकण्यात आली असून प्रामाणिक कार्यकर्त्यांना इम्तियाज गद्दार ठरवत असल्याचा संताप व्यक्त करत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी इम्तियाज जलील यांचे फोटो पायदळी तुडवले. आम्ही ओवोसी यांच्यासोबत आहोत, पण इम्तियाज जलील यांच्यासोबत नाही. त्यांना प्रदेशाध्यक्ष पदावरून हटवल्याशिवाय शांत बसणार नाही, असा इशाराही ▶▶ पान २ वर

### खोपोली हत्याकांडाचे बीड कनेक्शन समोर!

## हत्यारा वाल्मिक कराड गँगशी जोडलेला



मुंबई, (दिव्य न्युज):- सध्या सर्वत्र माजी नगरसेवर मंगेश काळोखे यांच्या निर्घृण हत्येची चर्चा सुरु आहे. मंगेश काळोखे हे रायगड जिल्ह्यातील खोपोली गावातील शिवसेना शिंदे गटाच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती होते. मंगेश यांच्यावर ५ ते ६ हल्लेखोरांनी तलवारीने जवळपास पान २ वर

# अजितदादा, तुमच्याकडे अर्थ खाते सढळ हाताने बीडकरांना निधी द्या

### धानोरा रोड, जिल्हा स्टेडियमचे रस्ते अर्धवटच होणार, पालकमंत्र्यांकडून जिल्ह्याला मोठ्या अपेक्षा

बीड, (दिव्य न्युज):- बीडमधील रस्ते विकास नेहमीच वादाचा विषय राहिला आहे. शहरातील बहुप्रतीक्षित धानोरा रोड आणि जिल्हा स्टेडीयम परिसरातील रस्त्यांच्या कामाला अखेर मंजुरी मिळाली असली, तरी ही कामे 'तुकड्या-तुकड्यांत' आणि अर्धवट होणार आहेत. पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे राज्याची तिजोरी (अर्थ खाते) आहे. त्यामुळे त्यांनी बीडच्या विकासासाठी सढळ हाताने निधी द्यावा, अशी आर्त हाक जिल्हावासीय देत आहेत.




### जिल्हा नियोजनमधून मोठा निधी हवा

बीड शहराचे विद्रुपीकरण थांबवण्यासाठी आणि रस्ते विकासासाठी केवळ 'पॅचवर्क' किंवा छोट्या निधीवर अवलंबून राहणे पुरेसे नाही. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून अजित पवार यांनी बीड शहरासाठी विशेष पॅकेज जाहीर करावे आणि जिल्हा नियोजन समितीमधून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी होत आहे. रस्ते पूर्ण लांबीचे आणि दर्जेदार झाल्यासच बीडकरांची खऱ्या अर्थाने त्रासातून सुटका होईल. सत्तेची सूत्रे हाती असताना पालकमंत्र्यांनी बीडकरांच्या या रास्त अपेक्षांची दखल घेणे आवश्यक आहे.

### धानोरा रोड : ११०० मीटरचे काम होणार, पुढच्या कामाचे काय ?

बीड नगरपरिषद पोलिस बंदोबस्तात हे काम पुन्हा सुरू करणार आहे. पोलिस मुख्यालयापासून सह्याद्री गॅरेजपर्यंत ११०० मीटरचा रस्ता ३ कोटी रुपये खर्चुन ७ मीटर रुंदीचा केला जाणार आहे. मात्र, या ११०० मीटरनंतरचा रस्ता पुन्हा 'जैसे थे' खड्डेमय राहणार आहे. केवळ एका ठराविक टप्प्यापुरतेच काम होणार असल्याने या भागातील नागरिकांना पूर्णतः दिलासा मिळणार नाही, हे स्पष्ट आहे.

### स्टेडियम कॉम्प्लेक्स : २ कोटींचा निधी तरीही धुळीचा आणि खड्ड्यांचा त्रास

जिल्हा क्रीडा संकुल परिसरात खेळाडू आणि नागरिकांची मोठी वर्दळ असते. या भागातील रस्त्यासाठी २ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. मात्र, आश्चर्याची बाब म्हणजे हा रस्ता केवळ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळा ते जालना रोडपर्यंतच मर्यादित आहे. मुख्य सुभाष रोड ते अहिल्यादेवी होळकर पुतळ्यापर्यंतचा अत्यंत वर्दळीचा रस्ता अद्यापही प्रलंबित आहे. पुढील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत यासाठी निधी घेण्याचे आश्वासन दिले जात असले, तरी तोपर्यंत बीडकरांना धुळीचा आणि खड्ड्यांचा त्रास सोसावाच लागणार आहे.



# बीडमध्ये शिस्तीचे प्रयोग; पाणी,वीज,सुरक्षेची आव्हाने कायम

## घंटागाड्या जीपीएसने स्वच्छतेवर राहणार नजर, मुलभुत प्रश्न सोडविण्यासाठी करावे लागणार व्यापक नियोजन

बीड, (दिव्य न्युज):- शहराच्या नागरी व्यवस्थापनात शिस्त आणण्यासाठी नगरपालिका प्रशासनाने एकाच वेळी अनेक पातळ्यांवर नियोजन सुरू केले आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी घंटागाड्यांना जीपीएस बसविण्याचा निर्णय, अनाधिकृत बॅनरबाजीवर नियमावली आणण्याची तयारी, रस्ते-नाली कामाचे नियोजन, पाणीपुरवठ्यावरील मर्यादा, वीजबिलांचा डोंगर आणि अग्निशमन व्यवस्थेची दयनीय अवस्था या सर्व बाबींचा लक्षात घेता बीड नगरपालिकेपुढील प्रशासकीय आव्हाने किती गंभीर आहेत, हे स्पष्टपणे दिसून येते.

बीड शहरातील प्रत्येक प्रभागासाठी एक या प्रमाणे २६ आणि व्यावसायिक भागासाठी १० अशा एकूण घंटागाड्यांना डीपीडीसीतून निधी मंजूर झाल्यानंतर पालिका प्रशासनाकडून त्या कायान्वित करण्यात आल्या आहेत. मात्र यापुढे या गाड्यांवर जीपीएस प्रणाली बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे येत्या आठ दिवसांत जीपीएस बसविल्यानंतर कोणती घंटागाडी कोणत्या प्रभागात गेली, किती किलोमीटर फिरली, नियमित सेवा



दिली का, याचा थेट मागोवा घेता येणार आहे. विशेष म्हणजे हे लोकेशन लोकप्रतिनिधींनाही उपलब्ध करून दिला जाणार आहे.दुसरीकडे, शहरात सातत्याने डोकेदुखी ठरत असलेल्या अनाधिकृत बॅनरबाजीवर आता ठोस नियमावली आणण्याची तयारी सुरू आहे. आजवर बॅनर काढले जातात, मात्र काही तासांत किवा दिवसांत ते पुन्हा उभे राहतात, हा अनुभव आहे. त्यामुळे आता बॅनर लावण्यासंदर्भात नियम ठरविणे, समिती स्थापन करणे, सार्वजनिक ठिकाणी बॅनर लावण्यासाठी स्वतंत्र एजन्सी नियुक्त करणे, तसेच राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि डिजिटल बॅनर बनविणाऱ्याऱ्यांनाही निवमांचे पालन करण्यास बांधील करणे, या दिशेने पावले टाकली जात आहेत, नियमांचे उल्लंघन झाल्यास थेट कायदेशीर कारवाई व गुन्हे दाखल करण्याच्या सूचना पोलिसांनाही देण्यात येणार असल्याने, याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्याची अपेक्षा नागरिकांना आहे. घंटागाडीवरील जीपीएसपासून अग्निशमन गाडीपर्यंतचा हा प्रवास, प्रशासन्नासाठी परीक्षा तर नागरिकांसाठी अपेक्षांचा विषय ठरला आहे.

### सिंमेट रस्ता, नाली काम सुरु होणार

शहरातील स्टेडिअम कॉम्पलेक्स परिसरातील सिमेंट रस्ता व नाली काम येत्या महिनाभरात होणार सुरु होणार असून सुरुवातीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यासमोरील रस्त्यापासून स्टेडिअम कॉम्पलेक्स परिसरापासून पुढे जालना रोडपर्यंत रस्ता काम हाती घेण्यात येणार आहे. यासाठी २ कोटीचा निधी मंजूर असून मार्चनंतर पुढील टप्प्यात उर्वरित काम होणार आहे.

### वीजेबाबत एजन्सीसोबत होणार करार

आगामी काळात बीड शहरातील पथदिवे व वीज पुरवठ्याचे नियोजन एका एजन्सीकडे सोपविले जाणार आहे. सदरील एजन्सी शासन नियुक्त करणार असून ती एजन्सी पालिके सोबत करार करणार आहे. हा करार झाल्यानंतर शहरातील ९५ टक्के वीज चालू व बंद करण्याचे काम संबंधित एजन्सी पाहणार आहे.

पान ४ वरून

## गरिबांच्या पोटावर

प्रकरणात अधिकाऱ्यांचे पाठबळ असल्याची चर्चा बीड जिल्ह्यात रंगत आहे. स्थानिक नागरिक आणि स्वस्त धान्य दुकानदारांनी जिल्हाधिकारी या प्रकरणात विशेष लक्ष देऊन पूर्ण पडताळणी करून गुन्हे दाखल करण्यात यावी व गोदाम कीपर विनोद दोडके यांची बीड शहर व बीड ग्रामीण गोदाम कीपरची हक्कलपट्टी करण्यात यावी नेकनूर, चौसाळा, ग्रामीण आणि बीड शहर या चारही गोदामांची सविस्तर चौकशी करण्याची मागणी केली जात आहे. धान्य किती आले, किती शिल्लक आहे आणि किती वितरित झाले याची पूर्ण पडताळणी व्हावी, अशी अपेक्षा आहे. या चौकशीत मोठा भ्रष्टाचाराचा विस्फोट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ग्रामीण गोदामात दुहेरी खेळ;एक धान्य देता दुसरा गायब

ग्रामीण गोदामात तर प्रकार फारच खतरनाक आहे. स्वस्त धान्य दुकानदारांना केवळ एक प्रकारचे धान्य दिले जाते, तर दुसरा धान्य गायब होतो. हा गायब धान्य थेट काळ्याबाजारात विकला जातो, असा ठोस आरोप आहे. दुकानदारांना दमदाटी करून कमी किमतीत धान्य खरेदी करून चव्हाट्यात विक्री केली जाते. यामुळे गरीब लाभार्थींचे नुकसान होत असून, सरकारी योजना अयशस्वी होत आहे.

## प्राणीमित्र परमेश्वर

श्री. नितीन आळकुटे यांच्या अचूक मार्गदर्शनाखाली सुमारे अर्धा तास चाललेल्या रेस्क्यू ऑपरेशननंतर साळ प्राण्याला सुखरूपपणे विहिरीबाहेर काढण्यात यश आले.रेस्क्यू यशस्वी झाल्यानंतर सदर साळ प्राण्याला हिवरा देवळा व अंभोरा परिसरातील निसर्गाच्या सान्निध्यात सुरक्षितरीत्या सोडून देण्यात आले. या बचावकार्यात श्री. घोडके यांना त्यांचे मित्र श्री. शंकर मार्तंड घोडके व चिरंजीव ईश्वर अर्जुन घोडके यांनी मोलाची मदत केली.

यावेळी बोलताना प्राणीमित्र समाजसेवक परमेश्वर रामचंद्र घोडके म्हणाले, निसर्गातील प्राण्यांचे जगणे हे मानवतेचे प्रथम कर्तव्य आहे. आम्ही ते जपण्याचा प्रयत्न करत आहोत. समाजानेही वन्यप्राण्यांचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे. श्री. नितीन आळकुटे यांनी दिलेल्या योग्य मार्गदर्शनामुळे साळ प्राण्याचा रेस्क्यू व त्याला पुन्हा निसर्गात सोडणे अत्यंत सोपे आणि सुरक्षित झाले.या घटनेमुळे परिसरात प्राणीप्रेमी व नागरिकांकडून श्री. घोडके व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक होत आहे.

## पोलीस कर्मचाऱ्याचे

समजून त्यांची काळजी घेणारे पोलिस अधिक्षक म्हणून श्री परदेशी यांचा मानवीय चेहरा पुढे आला. या भेटी दरम्यान पोलिस अधिक्षक परदेशी यांनी बाजेवर बसून शेकोटीचा आनंद घेत त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधत वडीलकीचे आशिर्वाद दिले तसेच मोरे कुटुंबियांचे मनोबल वाढविले. पोलिस अधिक्षक सारख्या मोठ्या पदावर असूनही परदेशी यांनी कोणताही बडेजावपणा न करता ठाणेदाराच्या कुटुंबियांना आपला अमूल्य वेळ देऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केल्याबद्दल ठाणेदार गजानन मोरे यांनी पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. तसेच पोलिस ठाण्याचे सर्व कर्मचारी यांनी देखील असे कुटुंबवत्सल पोलिस अधिक्षक लाभल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## पद्मश्री उमाकांत गुंदेचा

मध्ये सायंकाळी ६:३० वाजता या दिमाखदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमात पद्मश्री उमाकांत गुंदेचा यांना हा पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. बजरंग सोनवणे हे प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा हे उपस्थित राहणार असून एम आय टी पुणे चे कार्यकारी अध्यक्ष डॉ. मंगेश कराड यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त आयुक्त उमाकांत दांगट, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. नंदकिशोर मुंदडा हे उपस्थित राहणार आहेत.या पुरस्कार प्रदान कार्यक्रमानंतर लगेचच पद्मश्री उमाकांत गुंदेचा आणि अनंत गुंदेचा यांच्या धृपद गायनाचा कार्यक्रम होणार असून त्यांना पखवाजवर साथ पं. उध्दवबापू आपेगावकर हे देणार आहेत.या कार्यक्रमास सर्व रसिक श्रोत्यांनी व पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांच्या वर स्नेह करणा-यांनी उपस्थित रहावे असे आवाहन उध्दवबापू आपेगावकर व पद्मश्री शंकरबापू आपेगावकर परिवाराने केले आहे.

## बुलढाणा अर्बन बँकेची

या परिस्थितीत शाखा व्यवस्थापकांनी ग्राहकांना दिलासा देत स्पष्ट केले की बुलढाणा अर्बन बँक बंद होणार नाही. ग्राहकांच्या सोयीसाठी बँक रात्री दहा वाजेपर्यंत सुरू ठेवण्यात येणार असून, सर्वांनी शांतता व शिस्त राखून आपले व्यवहार करावेत, असे आवाहन त्यांनी केले. बँकेचे व्यवहार नियमितपणे सुरू राहणार असून कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, अफवांमुळे बँकिंग व्यवस्थेवर होणारा परिणाम लक्षात घेता प्रशासनानेही ग्राहकांना योग्य माहिती देण्याची गरज असल्याचे मत ग्राहकांनी व्यक्त केले आहे.खातेदारांनी अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा आणि अफवांमुळे घाईगडबड करू नये. बुलढाणा अर्बन बँकेच्या धारूर शाखेत सर्व व्यवहार सुरळीत सुरू असून ग्राहकांनी निर्धास्तपणे बँकिंग सेवा घ्याव्यात

## चहा पिण्याच्या बहाण्याने

कारण सांगत भूमापक माणिक वाघमारे याने दुरुस्ती करून देण्यासाठी सुरुवातीला ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. नंतर दोघांमध्ये तडजोड होऊन ३० हजार रुपयांवर व्यवहार ठरला.

यातील ५ हजार रुपये तक्रारदार शेतकऱ्याने त्याच दिवशी दिले होते, तर उर्वरित रक्कम नंतर देण्याचे ठरले. मात्र उर्वरित पैसे देण्याची इच्छा नसल्याने शेतकऱ्याने जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली. एसीबी अधिकाऱ्यांनी तक्रारीची चौकशी करून सत्यता पडताळल्यानंतर सापळा रचला. तक्रारदाराकडे देण्यासाठी अँथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा देण्यात आल्या तसेच व्हॉईस रेकॉर्डर लावून सापळ्याची संपूर्ण माहिती देण्यात आली.दि. २९ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे १.३० वाजता तक्रारदार शेतकरी भूमिअभिलेख कार्यालयात गेला आणि भूमापक वाघमारे याला १० हजार रुपये लाच देण्यासाठी आणल्याचे सांगितले. त्यानंतर दोघे तहसील कार्यालयासमोरील केज-माजलगाव रोडवरील पोलिस स्टेशन शेजारी असलेल्या चहाच्या टपरीवर चहा पिण्यासाठी गेले. तेथे वाघमारे याने तक्रारदाराकडून १० हजार रुपये स्वीकारताच दबा धरून बसलेल्या एसीबी पथकाने तात्काळ कारवाई करत त्याला रंगेहात पकडले.सरकारी पंचांसमक्ष झडती घेऊन लाचपोटी घेतलेली रक्कम जप्त करण्यात आली. ही कारवाई जालना विभागाचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उपअधीक्षक बाळासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शरदचंद्र रोडगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वी केली. या प्रकरणी केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पान १ वरून

## महापालिकेच्या

सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी इलेक्शन मिरीटवर उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला असला तरी कोणता राजकीय पक्ष आणि नेता कोणाबरोबर जाईल हे सांगता येणे अवघड आहे.

मुंबई महानगर पालिकेत काँग्रेस आणि वंचित आघाडी तर पुणे, पिंपरी चिंचवड महानगर पालिकेत शरद पवारांची राष्ट्रवादी आणि अजित पवारांची राष्ट्रवादी एकत्र येवून निवडणूक लढवू शकतात. या शिवाय अजुन बाजार कशाला म्हणायचे... त्यातच निष्ठावंत कार्यक्त्यांना डावलून ऐनवेळी प्रवेश करणाऱ्या स्थानिक उमेदवाराला उमेदवारी देण्याचा प्रकार सर्वच पक्षात झाल्याने निष्ठावंतांवर रडण्याची वेळ आली आहे. भाजपासारख्या शिस्तप्रिय पक्षात देखिल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेतही निष्ठावंतांवर अन्याय झाला आहे. तीच परिस्थिती शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहे. काल पर्यंत पक्षाच्या विरोधात आणि नेत्यांच्या विरोधात हाबूक ठोकणाऱ्या कार्यकर्त्याला त्याच पक्षाकडून उमेदवारी दिली गेली तर पक्षासाठी अहोरात्र झटणाऱ्या कार्यकर्त्यांनी काय करायचे? असा प्रश्न उपस्थित केला जात असून कोणत्या राजकीय पक्षाच्या नेत्यांनी निष्ठा कुठेच शिल्लक ठेवली नाही अशीच परिस्थिती महानगरामध्ये झाली आहे. सकाळी एका पक्षात आणि संध्याकाळी दुसऱ्या पक्षाची उमेदवारी असे जर राजकारणात होत असेल तर पक्षाची विचारधारा डोक्यात ठेवून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी काय करायचे आणि भविष्यात राजकीय पक्षांना निष्ठावंत कार्यकर्ते भेटणार कुठून? असा प्रश्न निर्माण झाला आहे. मुंबईध्ये भाजपा आणि शिंदेंची शिवसेना एकत्र लढत आहेत. मात्र पुण्यात अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी एक झाली आहे. पिंपरी चिंचवडध्ये देखिल दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढत आहेत. कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे आम्ही हा निर्णय घेतला असे रोहित पवारांनी सांगितले. खरे तर राज्याच्या राजकारणात मागील काही महिन्यांपासून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या बातम्या सातत्याने सुरू होत्या. त्याच बरोबर उध्दव ठाकरे आणि राज ठाकरे भविष्यात एकत्र येतील असे कोणीही सांगू शकत नव्हते. मात्र ते दोघेही एकत्र आले, गळाभेटी घेतल्या आणि आता निवडणूका ही लढवित आहेत. कोल्हापुरमध्ये घराणेशाहीचा आरोप झाल्यानंतर भाजपा नेत्यांना सर्व सामान्य कार्यकर्त्यांना उमेदवारी द्यावी लागली. छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपा आणि शिंदेंची शिवसेना यांच्या युतीमध्ये जागा वाटपावरून तिढा निर्माण झाला आहे. कोणत्या शहरात कोण कोणते पक्ष एकत्र लढत आहेत हे आज तरी सांगणे अवघड आहे. मुंबई सारख्या शहरामध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीला उमेदवार मिळू नयेत ही पवारांच्या राजकारणाची शोकांतिका नाही का? राजकारणात सगळेच डाव यशस्वी होताता असे नसते. मुंबईध्ये अजित पवारांची राष्ट्रवादी स्वतंत्रपणे लढत आहे. शरद पवारांच्या आणि अजित पवारांच्या ऐक्यामुळे लोकसभेत भाजपाची दणादाण उडवून देणाऱ्या आघाडीमध्ये उभी फुट पडली आहे. काँग्रेस कुठे वंचित बरोबर तर कुठे ठाकरेंच्या शिवसेनेबरोबर लढत आहे. भाजपा, अजित पवारांची राष्ट्रवादी, शरद पवारांची राष्ट्रवादी अशा बलाढ्य पक्षातील कार्यकर्ते उमेदवारी मिळाली नाही म्हणून दुसऱ्या पक्षात जात आहेत. दुसऱ्या पक्षातून आलेल्या कार्यकर्त्यांना थेट उमेदवारी दिली जात आहे. राजकारणाचा हा बाजार केवळ सत्तेसाठी राजकारण याचेच संकेत देत आहेत. सर्वच जण सत्तेत आणि सत्तेत असणाऱ्या पक्षा बरोबर आघाडी करीत असतील तर विरोधात कोण? असा प्रश्न महानगर पालिकांच्या निवडणुकीमध्ये निर्माण झाला आहे.

## होळच्या कोलंबस स्वस्त

संस्थेच्या अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या रास्त भाव दुकानाचे प्राधिकारपत्र चेअरमन रामचरण उर्फ बंडू घुगे यांच्या नावावर आहे. या दुकानासंदर्भात जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी शासन निर्णय दि.७ जून २०२१ नुसार कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार संबंधित दुकानदाराकडून नव्याने १०० टक्के अनामत रक्कम शासनखाती जमा करून घेण्यासह अन्य दंड म्हणून ५ हजार रुपये वसूल करून शासन खात्यात जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यापुढे अशा स्वरूपाच्या तक्रारी उद्भवू नयेत आणि प्राधिकारपत्रातील अटी व शर्तींचा भंग होणार नाही, यासाठी तहसीलदारांनी संबंधित रास्त भाव दुकानदाराला सक्त ताकीद देऊन ५०० रुपयांच्या बाँडवर लेखी बंधपत्र घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परंतु, धान्य जप्त केलेले धारूर पोलिस गुन्हा कधी नोंद करणार? असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

४५ क्विंटल धान्य जप्त; पोलिसांचे 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष

दि.१४ जुलै २०२५ रोजी दुपारी ४.३० वाजता होळचे उपसरपंच बाळासाहेब तुकाराम घुगे यांच्या कोलंबस सहकारी संस्था अंतर्गत असलेल्या राशन दुकानातून ४४ क्विंटल स्वस्त धान्य काळ्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना धारूर पोलिसांनी टेम्पो क्रमांक एम.एच. ४४ यू २२५७ सह धान्य जप्त केले. हे धान्य अशोक तुकाराम घुगे यांच्यामार्फत विक्रीसाठी नेले जात असल्याची कबुली वाहन चालक इब्राहिम शेख याने पोलिस पंचनाम्यात दिली होती. तरीही गुन्हा दाखल करण्याकडे पुरवठा विभागासह पोलिसांनी 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष केले आहे.

गुन्हा दाखल करण्यासाठी आंदोलनाचा इशारा

फौजदारी कारवाईसाठी धारूरचे सहायक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे आणि तहसीलदार श्रीकांत निळे, पुरवठा निरीक्षण अधिकारी नारायण काकडे यांनी एकमेकांकडे बोट दाखवल्याने गुन्हा दाखल होऊ शकलेला नाही. याप्रकरणात गुन्हा दाखल करण्यासाठी आंदोलन छेडण्याचा इशारा तक्रारदार विजय केंद्रे, धनराज लाटे यांच्यासह ग्रामस्थांनी दिला आहे.

## १५-१५ लाख रुपयांना

यावेळी देण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीत स्वबळावर लढणाऱ्या एमआयएम पक्षाने सर्वात आधी उमेदवारी यादी जाहीर करत आघाडी घेतली होती. आज उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी आपल्या सर्व २६ उमेदवारांची यादी आपल्या फेसबुक पेजवर पोस्ट केली होती. आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने अनेक इच्छुक आशेवर बसले होते. परंतु आपल्याला उमेदवारी मिळणार नाही हे स्पष्ट झाल्यावर एमआयएमच्या कार्यकर्त्यांनी इम्तियाज जलील यांना शिव्यांची लाखोली वाहत रस्त्यावर उतरत संताप व्यक्त केला.

मध्य विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढलेले नासेर सिद्दीकी यांचा यात पुढाकार होता. इम्तियाज जलील यांनी पक्ष विकायला काढला आहे. पाच ते पंधरा लाख रुपये घेऊन तिकीटं विकण्यात आली आहेत. पक्षात वर्षानुवर्ष काम करणाऱ्या निष्ठावंतांना इम्तियाज जलील गद्दार ठरवत आहे. आम्ही सर्व कार्यकर्ते असदुद्दीन ओवेसी यांच्यासोबत आहोत, पण इम्तियाज जलील याच्यासोबत नाही. त्यांना प्रदेशाध्यक्ष पदावरून हटवल्याशिवाय शांत बसणार नाही, असा इशारा देतानाच आक्रमक झालेल्या काही कार्यकर्त्यांनी पक्ष कार्यालयावर धडकणार असल्याचे सांगितले.

एका संतप्त कार्यकर्त्याने तर विनोद पाटील आणि सिल्लोडचे आमदार अब्दुल सत्तार यांच्या सांगण्यावरून एमआयएम पक्षाची तिकीटी वाटली गेल्याचा गंभीर आरोप केला. दरम्यान, इम्तियाज जलील यांनी कालच आपल्या सोशल मिडिया अकाऊंटवरून व्हिडिओ जारी करत उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या कार्यकर्त्यांना शांत राहण्याचे आवाहन केले होते. इच्छुकांची संख्या अधिक आणि उमेदवारी देण्याच्या मर्यादा पाहता अनेकजण नाराज होतील, मला शिव्या देतील, पण सगळ्यांना न्याय देणे शक्य नाही. तुमच्या सगळ्यांमुळेच पक्ष मोठा झाला आहे.आता संधी मिळाली नाही, अशांनी पक्षाचे काम प्रामाणिकपणे करत राहावं. पक्षाचे तुमच्यावर बारीक लक्ष असते. योग्यवेळी तुम्हाला नक्कीच संधी दिली जाईल. कोणीही गडबड, गोंधळ किंवा पक्षाला अडचण होईल, असे कृत्य करू नये, असे आवाहन इम्तियाज जलील यांच्याकडून करण्यात आले होते. मात्र आज नाराज कार्यकर्त्यांच्या संतापाचा भडका उडालाच.

## हत्यारा वाल्मिक

१९ ते २० वार करुन त्यांची हत्या केली. आता या प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे. या हत्येचे बीडमधील वाल्मीक कराड कनेक्शन आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगितले आहे.

आमदार महेंद्र थोरवे यांनी काल मंगेश काळोखे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. तसेच त्यांनी या प्रकरणाचे बीड कनेक्शन काय आहे हे सांगितले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी रवी देवकर याचा बॉडीगार्ड हा बीडचा असल्याचे सांगितले आहे. तसेच या बॉडीगार्डने जवळपास १९ वार करुन मंगेश काळोखे यांची हत्या केल्याचा दावा देखील केला आहे. तसेच त्याचे बड्या नेत्यांशी एकदम जवळचे संबंध असल्याचा खळबळजनक आरोप देखील महेंद्र थोरवे यांनी केले आहेत.मी आल्यानंतर मंगेशच्या परिवाराने मला धक्कादायक माहिती सांगितली. जो रवी देवकर यांचा बॉडीगार्ड आहे (महेश धायतडक) त्यांनी मंगेशवर तेरा वार एकट्याने केले आहेत. तो जो बॉडीगार्ड आहे तो वाल्मीक कराडचा साथीदार आहे आणि वाल्मीक कराडच्या बरोबर त्याच्या पेजवर त्याचं नाव आहे. त्याच्या ग्रुपवर तो आहे. धनंजय मुंडे सोबत गडावरचे देखील त्याचे फोटो आहेत. तो वॉन्टेड आहे रवी देवकर यांनी खास हत्या करण्यासाठी त्याला या ठिकाणी आणलेला होता. हे सर्व राष्ट्रवादी कनेक्शन आहे. धनंजय मुंडे वाल्मीक कराड आणि हा रवी देवकर यांनी आणलेला बॉडीगार्डची मंगेशची क्रूर हत्या करण्यामध्ये समावेश आहे असे आमदार महेंद्र थोरवे म्हणाले.

# हज यात्रेला जाणाऱ्या भाविकांसाठी एक महिन्याची मार्गदर्शन कार्यशाळा

## जिल्हा खादीम उल हुज्जाज कमिटीचा पुढाकार

बीड, (दिव्य न्युज):- हज यात्रा २०२६ साठी बीड शहरातून जाणाऱ्या यात्रेकरूंना प्रवासातील बारकावे आणि धार्मिक विधींचे योग्य शिक्षण मिळावे, यासाठी बीड जिल्हा खादीम-उल-हुज्जाज कमिटीकडून एक महिन्याची विशेष मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. जानेवारी महिन्यापासून सुरू होणाऱ्या या शिबिरात पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

बीड शहरातील पुरुष यात्रेकरूंसाठी ही कार्यशाळा २ जानेवारी २०२६ पासून सुरू होईल. बीड शहरातील मोमीनपुरा भागातील मदीना मस्जिद येथे दररोज रात्री ९ वाजता हे मार्गदर्शन सत्र पार पडणार आहे.केवळ पुरुषांसाठी असलेल्या कार्यशाळेत या हज यात्रेतील तांत्रिक आणि धार्मिक बाबींची सविस्तर माहिती दिली जाईल. तसेच



हज यात्रेला जाणाऱ्या महिला भाविकांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन शिबिराचे आयोजन १० जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे.

बीड शहरातील बलभीम चौक येथील मदरसा-तुल-मोमीनात येथे दुपारी २:३० वाजता हे शिबिर पार पडेल. महिलांनी या संधीचा जास्तीत जास्त



लाभ घ्यावा, असे आवाहन कमिटीने केले आहे.बीड जिल्हा खादीम-उल-हुज्जाज कमिटी गेल्या तीन वर्षांपासून जिल्ह्यातील हाजींच्या सेवेसाठी अशा प्रकारच्या कार्यशाळांचे करत आहे.

**मुफ्ती अब्दुल मुखिम करणार मार्गदर्शन**

मुस्लिम धर्मात सक्षम असलेल्या प्रत्येक व्यक्तीने आयुष्यात एकदा 'हज' फर्ज (अनिवार्य) आहे. मक्का आणि मदीना या जगातील सर्वात पवित्र स्थळी जाऊन हे आमाल पूर्ण करावे लागतात. यात्रेकरूंना उमराह, हज आणि तेथील इतर धार्मिक कार्ये (आमाल) सविस्तरपणे समजून घेता यावीत, यासाठी ज्येष्ठ धर्मगुरू मुफ्ती अब्दुल मुखिम हे सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत.

# तलाठी मारहाणप्रकरणी महसूल प्रशासनाचे कामबंद आंदोलन तीव्र

वडवणी, (दिव्य न्युज):- तालुक्यात शासकीय कर्तव्य बजावत असताना तलाठी गौतम वडमारे यांच्यावर झालेल्या जातिवाचक शिवीगाळ व मारहाण प्रकरणामुळे संपूर्ण महसूल प्रशासनात तीव्र संतापाची लाट उसळली असून, गेल्या चार दिवसांपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू आहे.

वडवणी तालुक्यातील गट नंबर ६५६ येथील गायरान (शासकीय) जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईसाठी गेलेल्या तलाठी गौतम वडमारे यांना अडवून आरोपींनी जातीचा उल्लेख करत शिवीगाळ केली व मारहाण केल्याची गंभीर घटना घडली होती. या प्रकरणी वडवणी पोलिस ठाण्यात आठ आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मात्र गुन्हा दाखल होऊन अनेक दिवस उलटूनही एकाही आरोपीला अटक न झाल्याने महसूल कर्मचाऱ्यांचा रोष अधिक वाढला आहे. या पार्श्वभूमीवर वडवणीजादी अमृत महोत वडवणी तालुक्यातील सहायक महसूल प्रशासनाने २४ डिसेंबरपासून बेमुदत काम बंद आंदोलन पुकारले आहे. तहसील कार्यालयाच्या प्रवेश द्वारासमोर महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी व इतर कर्मचारी यांनी ठिय्या मांडून जोरदार निषेध नोंदविला आहे. आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले की, शासकीय जमिनीचे संरक्षण व अतिक्रमण हटविणे ही महसूल विभागाची कायदेशीर व प्रशासकीय जबाबदारी आहे. ती जबाबदारी पार पाडत असताना कर्मचाऱ्यांवर हल्ले होणे हे अत्यंत गंभीर असून, जातिवाचक शिवीगाळ व मारहाण हा केवळ एका तलाठ्यावर नव्हे, तर संपूर्ण प्रशासनावर झालेला हल्ला आहे.

या प्रकरणातील आरोपींना तत्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी महसूल कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्यात यावे, अशी



ठाम मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.कामबंद आंदोलनामुळे तालुक्यातील महसूल विभागाशी संबंधित अनेक महत्त्वाची कामे पूर्णतः ठप्प झाली आहेत. दैनंदिन शासकीय कामकाजावर मोठा परिणाम होत असून, नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. त्यामुळे प्रशासनावर ताणही वाढला आहे. दरम्यान, आरोपींच्या अटकेबाबत पोलिस प्रशासनाकडून ठोस भूमिका घेतली जात नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.जोपर्यंत आरोपींना अटक करून कठोर कारवाई केली जात नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशारा महसूल कर्मचाऱ्यांनी दिला आहे. या गंभीर प्रकरणाकडे जिल्हा प्रशासन व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी, अशी जोरदार मागणी महसूल कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# अंबाजोगाई नगरपालिकेत 'स्त्री-शक्ती'चा डंका

## ३१ पैकी १७ जागा महिलांनी केल्या काबीज

अंबाजोगाई, (दिव्य न्युज):- येथील नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत महिला उमेदवारांनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. नगरपालिकेच्या एकूण ३१ जागांपैकी तब्बल १७ जागांवर महिलांनी विजय मिळवत शहराच्या राजकारणात आपले अढळ स्थान सिद्ध केले आहे. या निकालामुळे नगरपालिकेत आता महिलांची शक्ती निर्णायक ठरणार असून सत्तेचा रिमोट कंट्रोल आता खऱ्या अर्थाने महिलांच्या हाती आला आहे.

अंबाजोगाई नगरपालिकेची निवडणूक तब्बल नऊ वर्षांनंतर झाली. यामुळे उमेदवारांसह मतदारांमध्ये उत्साह होता. राजकारणातील 'अर्धे आकाश' व्यापणाऱ्या महिलांनी अंबाजोगाई नगरपालिकेत ५० टक्क्यांहून अधिक जागा जिंकून पुरुषांनाही मागे टाकले आहे. केवळ आरक्षित जागाच नव्हे, तर खुल्या वर्गातूनही महिलांनी आपले नेतृत्व सिद्ध केले आहे. मात्र बहुतांश महिला निवडून आल्यानंतर त्यांचे पती किंवा मुलगा 'नगरसेवक' म्हणून काम पाहतात, असे चित्र पाहायला मिळते. यामुळे महिलांना मिळालेल्या आरक्षणाचा आणि प्रतिनिधित्वाचा मूळ उद्देश साध्य होत नाही. त्यामुळे या निवडणुकीत विजयी झालेल्या महिलांनी स्वतः सभागृहात उपस्थित राहून शहराचे प्रश्न मांडून सक्रियपणे काम करावे, अशी रास्त अपेक्षा मतदारांकडून व्यक्त होत आहे. निवडून आलेल्या या १७ रणरागिणींनी विकासाचे नवे पर्व सुरू करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शामशाद बेगम अय्युब कुरेशी, काळे मैनाबाई सदाशिव, शेख शिरीन अशफाक, सौ. श्रुती अमोलराव लोमटे, लोमटे संगिता दाजीसाहेब, देशपांडे सुचिता अतुल, सोनल श्रीकांत धायगुडे, गंभिरे शिल्पा संजय, लोमटे दिपा बबन, परदेशी रचना किशोरकुमार, सरवदे सोनी दत्तात्रय, शेख शमीम शेख रहीम, सय्यद बशीरा शफीक, पठाण नाजनीन बेगम अकबरखाँ, आदमाने बबीता महादेव, साठे जयश्री पृथ्वीराज, जाधव रेखा विलास. यामध्ये लोकविकास महाआघाडी १० तर परिवर्तन जनविकास आघाडी ०७ अशा १७ महिला सभागृहात जाणार आहेत. निवडणूकीत निवडणूक आलेल्या महिलांची टक्केवारी ५४.८% एवढी आहे.

# इलेक्ट्रॉनिक वजन काट्यांची पडताळणी दरवर्षीच करावी लागणार

## व्यापाऱ्यांमधील संभ्रमावर वैध मापनशास्त्र विभागाचे स्पष्टीकरण

बीड , (दिव्य न्युज):-केंद्र सरकारच्या ग्राहक संरक्षण, अन्न व वितरण मंत्रालयाने १८ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या नवीन अधिसूचनेमुळे व्यापारी वर्गामध्ये वजन आणि मापांच्या पडताळणीबाबत मोठ्या प्रमाणावर संभ्रम निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर बीड विभागाचे वैध मापनशास्त्र निरीक्षक गणेश मिसाळ यांनी अधिकृत स्पष्टीकरण प्रसिद्ध केले असून, इलेक्ट्रॉनिक काट्यांची पडताळणी पूर्वीप्रमाणेच दर १२ महिन्यांनी म्हणजेच दरवर्षी करणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट केले आहे. सोशल मीडियावर फिरणाऱ्या चुकीच्या माहितीमुळे व्यापाऱ्यांनी कोणत्याही गैरसमजात राहू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

केंद्र शासनाने वैध मापनशास्त्र (सामान्य) नियम २०११ मधील नियम २७ (२) (क) मध्ये महत्त्वाची सुधारणा केली आहे. या नवीन नियमानुसार आता सर्व प्रकारची वजने, धारिता मापे, लांबी मोजमापे, टेप, बीम स्केल, काउंटर मशीन आणि विशेषतः पेट्रोल-डिझेलच्या इंधन डिस्पेंसरसाठी पडताळणीची मुदत २४ महिने करण्यात आली आहे. १८ डिसेंबर २०२५ पूर्वी इंधन डिस्पेंसरची पडताळणी दरवर्षी करावी लागत होती, मात्र आता ती दोन वर्षांसाठी ग्राह्य धरली जाणार आहे. या सुधारणेनंतर काही व्हॉट्सप मेसेज आणि अनधिकृत प्रेस नोटद्वारे इलेक्ट्रॉनिक काट्यांची मुदतही २४ महिने झाल्याची अफवा पसरली होती.

वैध मापनशास्त्र विभागाने यावर अधिकृत खुलासा करताना सांगितले की, नवीन अधिसूचनेत केवळ ठराविक यांत्रिक उपकरणांचा आणि इंधन डिस्पेंसरचा समावेश करण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक वजन काट्यांच्या पडताळणीच्या मुदतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. त्यामुळे सर्व व्यापारी बंधूंनी आपल्याकडील इलेक्ट्रॉनिक काट्यांची पडताळणी दर १२ महिन्यांनी म्हणजेच एका वर्षाच्या आत करून घेणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे. व्यापाऱ्यांनी नियमांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे आणि कोणत्याही चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये, असे पत्रक निरीक्षक गणेश मिसाळ यांनी जारी केले आहे.




# गोदाकाठच्या वाघाने थंडीत उघड्यावर शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांकडे पाहावे!

## पालकमंत्री अजितदादांचा ताफा अडवून काळे झेंडे दाखवण्याचा इशारा - डॉ. गणेश ढवळे

बीड, (दिव्य न्युज):- माजलगाव तालुक्यातील गेवराई मतदारसंघातील टाकरवण केंद्रांतर्गत दत्तनगर वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांवर शिक्षणासाठी अक्षरशः उघड्यावर बसण्याची वेळ आली आहे. सुसज्ज शाळा इमारत असतानाही गेल्या दोन महिन्यांपासून शाळेकडे जाणारा रस्ता बंद झाल्याने विद्यार्थ्यांना लिंबाच्या झाडाखाली, थंडी-ऊन्ह-वारा सहन करत शिक्षण घ्यावे लागत आहे.

या गंभीर प्रकाराबाबत सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे यांनी दि. २२ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या मार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री अजितदादा पवार व आमदार विजयीळपह पंडित यांना लेखी निवेदन दिले होते. मात्र महिन्याहून अधिक कालावधी उलटूनही कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.दत्तनगर वस्ती शाळेत इयत्ता १ ते ४ चे ३५ विद्यार्थी शिक्षण घेत असून २ ते ३ शिक्षक कार्यरत आहेत. २००७-०८ मध्ये शासनाने तीन वर्गखोल्यांची इमारत बांधली आहे. मात्र परिसरातील वाढलेल्या बांधकामामुळे मागील दोन महिन्यांपासून शाळेचा रस्ता पूर्णपणे बंद झाला आहे. परिणामी विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छतागृह, निवारा अशा मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे.

अंगणवाडीही बंद - बालक व गरोदर मातांचे हाल

शाळेजवळील अंगणवाडीत ६४ बालके व ५ गरोदर मातांची नोंद असून रस्ता बंद असल्यामुळे अंगणवाडीही बंद आहे. लसीकरण व पूरक आहारासाठी लाभार्थ्यांना दूर पायपीट करावी लागत असून याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे.

आंदोलनाचा इशारा

प्रशासनाने वारंवार निवेदन देऊनही दखल न घेतल्याने अखेर दि. ३१ डिसेंबर रोजी बीड येथील सहकार संकुल भवनाच्या भूमिपूजनासाठी येणाऱ्या उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवून निदर्शने करण्याचा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.यावेळी त्यांनी गोदाकाठचा वाघ अशी उपाधी घेतलेल्या आ. विजयीळपह पंडित यांनी त्यांच्या गेवराई मतदारसंघातील शालेय मुलांचा रस्त्याचा प्रश्न तातडीने सोडवावा, अशी जोरदार मागणी केली आहे.



# गरिबांच्या पोटावर पाय देत दोड केबनला व्यापारी गोदामात घोटाळ्याची मालिका सुरू करी??

## चौसाळा, नेकनूर, बीड शहर ग्रामीण गोदामांची पडताळणी करा?

**बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यात स्वस्त धान्य योजनेचा सर्वात मोठा घोटाळा उघड होण्याच्या उंबरठ्यावर असून, यात गोदामकीपर विनोद दोडके यांचा मध्यवर्ती भूमिका असल्याचे गंभीर आरोप आहेत. दोडके हे आता सरकारी गोदामकीपर नसून खऱ्या अर्थाने होलसेल व्यापारी झाले आहेत. स्वस्त धान्य दुकानदारांकडून फक्त १००० रुपयांना धान्य खरेदी करून तेच काळया बाजारात २४०० रुपयांना विक्री करत असल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. हा सर्व धंदा राजेरोसपणे चालू असून, बीड शहरात या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे.गोदामात लुट धान्य! बीड दोड,के भुकेल्या खावट्या व्यापारी! घोटाळा भोकंळला, कमिशन डबल गेम! सुरू आहे.**

स्वस्त धान्य दुकानदारांना दमदाटी करून कमी किमतीत धान्य खरेदी करून चव्हाट्यात विक्री केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. अधिकाऱ्यांच्या पाठबळामुळे हा सर्व खेळ चालू असल्याची चर्चा आहे. जिल्हाधिकारी यांनी नेकनूर, चौसाळा, ग्रामीण व बीड शहर या चारही गोदामांची सखोल चौकशी करावी, धान्याची आगमन-शिल्लक पडताळणी करावी, अशी मागणी होत आहे. या प्रकरणाचा मोठा विस्फोट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.बीड शहर आणि ग्रामीण गोदामे सुरू आहेत.ग्रामीण गोदामात स्वस्त धान्य दुकानदारांना एक प्रकारचे धान्य दिले जाते, तर दुसरे धान्य गायब होत असल्याचे उघड होत आहे. हे धान्य थेट काळ्या बाजारात विकले जात असल्याचा संशय आहे. चौसाळा आणि नेकनूर गोदामांमध्येही मोठा घोळ झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. दोडके यांच्याकडून स्वस्त धान्य दुकानदारांना दमदाटी करून कमी किमतीत धान्य खरेदी करून घेतले जाते आणि अधिक भावाने विकले जाते, अशी धक्कादायक बाब समोर आली आहे.या ▶▶ पान २ वर

### चार गोदामांवरून फक्त दोन शिल्लक

चौसाळा-नेकनूरवर संशयगेल्या महिन्यापूर्वी दोडके यांच्याकडे नेकनूर, चौसाळा, बीड शहर आणि ग्रामीण असे एकूण चार गोदाम होते. मात्र, अचानक चौसाळा आणि नेकनूर या दोन गोदामांवर नवीन कर्मचाऱ्यांची नेमणूक झाल्याने आता फक्त बीड शहर आणि ग्रामीण हे दोन गोदाम दोडके यांच्याकडे शिल्लक आहेत. या बदलामागे काय खटक आहे, याबाबत संशय निर्माण झाला आहे. चौसाळा आणि नेकनूर गोदामांमध्ये मोठा धान्याचा घोळ झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. या गोदामांमधील स्टॉकची पडताळणी झाली तर मोठा भ्रष्टाचार उघड होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांकडून तात्काळ चौकशीची मागणी

या प्रकरणाची गांभीर्य ओळखून जिल्हाधिकारी यांनी तात्काळ कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. नेकनूर, चौसाळा, बीड शहर आणि ग्रामीण या चारही गोदामांची सखोल चौकशी व्हावी. प्रत्येक गोदामात धान्य किती आले, किती वाटप झाले, किती शिल्लक आहे - याची पूर्ण पडताळणी करावी. या चौकशीतून मोठा भ्रष्टाचार आणि घोटाळ्याचा विस्फोट होईल, यात शंका नाही. गरीबांचे स्वस्त धान्य असा लुटला जात असताना प्रशासन काही बोलत नाही, ही बाब अत्यंत निंदनीय आहे.बीड जिल्ह्यातील हा घोटाळा उघड होण्याची वेळ आली आहे. जिल्हाधिकारी साहेब, चारही गोदामांना भेट देऊन प्रत्यक्ष स्टॉक तपासणी करा आणि भ्रष्टाचाराला लगाम घाला!




### ❝ अधिकाऱ्यांचे पाठबळ; जिल्ह्यात जोरदार चर्चा ❝

या सर्व कारभारामागे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पाठबळ असल्याची चर्चा बीड जिल्ह्यात जोर धरून आहे. दोडके यांचा हा मनमानी कारभार खुलेआम चालू असून, कोणालाही आव्हान देण्याची हिंमत होत नाही. स्वस्त धान्य दुकानदारांना धमकावून कमी भावाने खरेदी करणे, गोदामातील स्टॉक गायब करणे आणि काळ्याबाजारात विक्री - हा सर्व खेळ अत्यंत नावीन्यपूर्ण पद्धतीने चालला आहे.

# प्राणीमित्र परमेश्वर घोडके यांनी ‘साळ’ प्राण्याला दिले जीवदान

दौलावडगाव, (दिव्य न्युज):- दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता सुलेमान देवळा ते अंभोरा शिवावर (ता. आष्टी)श्री. परमेश्वर गवळी यांच्या शेतातील पाण्याच्या विहिरीत एक वन्यप्राणी अपघाताने पडल्याची माहिती मिळाली. सदर घटनेची प्रथमदर्शनी माहिती मिळताच ही बाब प्राणीमित्र व समाजसेवक श्री. परमेश्वर रामचंद्र घोडके यांच्या निदर्शनास आणण्यात आली.

घटनास्थळी पाहणी केल्यानंतर विहिरीत पडलेला प्राणी हा ‘साळ’ असल्याचे स्पष्ट झाले. साळ हा दुर्मिळ होत चाललेला वन्यप्राणी असल्याने तातडीने बचावकार्य हाती घेण्यात आले. प्राणीमित्र ▶▶ पान २ वर



# पोलीस कर्मचाऱ्याचे कुंटूब आपले कुंटूब समजून त्यांची काळजी घेणारे पोलीसअधिक्षक रविंद्रसिह परदेशी

परभणी, (दिव्य न्युज):- ताडकळस पोलिस ठाणे परिसरात शनिवारी रात्री गस्तीवर असताना ताडकळस येथील नाकाबंदी ठिकाणांची पाहणी करताना तसेच पोलिस ठाणे परिसराची पाहणी करताना ताडकळस पोलिस ठाण्याचे ठाणेदार गजानन मोरे हे सहकुटुंब पोलिस वसाहतीत एकटेच राहात असल्याची माहिती मिळताच पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी ठाणेदार गजानन मोरे यांच्या शासकीय कॉर्टरला भेट देऊन ठाणेदार गजानन मोरे यांची सहकुटुंब भेट घेऊन आस्थेवाईक चौकशी केली.पोलिस दलास आपले कुटुंब ▶▶ पान २ वर



# महाराष्ट्र-गोवा नोटरीज् असोसिएशनच्या मराठवाडा विभाग सहसचिवपदी ॲड. सय्यद अशरफ

पाटोदा (दिव्य न्युज):- महाराष्ट्र व गोवा राज्यातील नोटरींच्या हितसंबंधासाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र अँड गोवा नोटरीज असोसिएशनच्या मराठवाडा विभागाच्या संयुक्त सचिव पदी पाटोद्याचे ज्येष्ठ अधिवक्ता तथा नोटरी ॲड. सय्यद अशरफ महेबूब यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते करण्यात आली असून, त्याबाबतचे अधिकृत नियुक्तीपत्र दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी देण्यात आले आहे. असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सय्यद सिकंदर अली, कार्याध्यक्ष ॲड. यशवंतराव खारडे व सचिव ॲड. प्रविण एच. नळवडे यांच्या स्वाक्षरीने हे नियुक्तीपत्र जारी करण्यात आले आहे.नियुक्तीपत्रात असोसिएशनच्या कार्यासाठी ॲड. अशरफ महेबूब यांचे सहकार्य व मार्गदर्शन अपेक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल पाटोदा तालुक्यासह मराठवाडा विभागातील अधिवक्ता व नोटरी वर्गातून अभिनंदन करण्यात येत आहे.



# पद्मश्री उमाकांत गुंदेचा यांना पद्मश्री शंकरबापू धृपद गौरव पुरस्कार

## ४ जानेवारी रोजी होणार वितरण

अंबाजोगाई, (दिव्य न्युज):-आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रख्यात धृपद गायक पद्मश्री उमाकांत गुंदेचा यांना यावर्षीचा पद्मश्री शंकरबापू धृपद गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला असून ४ जानेवारी रोजी या पुरस्काराचे वितरण आणि पद्मश्री उमाकांत गुंदेचा व अनंत गुंदेचा यांच्या धृपद गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती पं. उध्दवबापू आपेगावकर यांनी दिली आहे.

तपस्वी पखवाज साधक पद्मश्री शंकरबापू यांच्या २२ व्या पुण्यस्मरण निमित्ताने ४ जानेवारी २०२६ रोजी हॉटेल इट ऍन्ड स्टे च्या फंक्शन हॉल ▶▶ पान २ वर



# गजानन बँकेच्या वतीने केशर ऋण रक्षा निधी योजनेचे धनादेश वाटप



बीड, (दिव्य न्युज):-श्री गजानन नागरी सहकारी बँकेने मयत पगारदार सभासद/नाम मात्र सभासदांना केशर ऋण रक्षा निधी योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेद्वारे वसुलीस मदत होते व त्याद्वारे मयत काळे दीपक देविदास,वंजारे भीमराव बाबुराव व माने दत्तात्रय बाबुराव यांना केशर ऋण रक्षा निधीचे चेक बँकेचे चेअरमन तथा माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे हस्ते वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाला बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी एम.आर.क्षीरसागर, सरव्यवस्थापक डॉ.शेख एम.एस., व्यवस्थापक विलास कुंबेफळकर व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# बुलढाणा अर्बन बँकेची शाखा बंद होण्याच्या अफवांमुळे धारूर येथील शाखेत ग्राहकांची मोठी गर्दी

धारूर, (दिव्य न्युज):- बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीची धारूर येथील शाखा बंद होणार असल्याच्या अफवांमुळे मंगळवारी (दि. ३०) बँकेत ग्राहकांची मोठी गर्दी झाली. वडवणी येथील शाखेमध्ये २९ डिसेंबर रोजी बँक बंद होण्याची चर्चा पसरल्याने धारूर परिसरातील खातेदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. या भीतीपोटी अनेक ग्राहकांनी एकाच वेळी बँकेत धाव घेत आपले व्यवहार पूर्ण करण्यासाठी गर्दी केली.

सकाळपासूनच शाखेत बचत खाते, मुदत ठेव, सोने कर्ज खाते तसेच इतर व्यवहारांसाठी ग्राहकांची रांग लागली होती. काही ग्राहकांनी आपले ठेव खाते बंद करण्याची प्रक्रिया सुरू केली, तर काहींनी रोख रक्कम काढण्यासाठी गर्दी केली. अचानक वाढलेल्या गर्दीमुळे बँक कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला असला तरी सर्व व्यवहार सुरळीतपणे पार पाडण्यासाठी कर्मचारी प्रयत्नशील होते.

▶▶ पान २ वर



# चहा पिण्याच्या बहाण्याने कार्यालयाबाहेर आला अन् ’एसीबी’च्या जाळ्यात अडकला

केज (दिव्य न्युज):- शेतकऱ्याच्या जमिनीची मोजणी झाल्यानंतर क्षेत्र दुरुस्ती करून देण्यासाठी ३० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या भूमापकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. केज तहसील कार्यालयासमोरून जाणाऱ्या महामार्गावरील एका हॉटेलमध्ये १० हजार रुपये लाच स्वीकारताना भूमापक माणिक वाघमारे याला एसीबी पथकाने जेरबंद केले.

या प्रकरणाची माहिती अशी की, केज तालुक्यातील बोरगाव येथील एका शेतकऱ्याने दि. १८ डिसेंबर रोजी भूमिअभिलेख कार्यालयामार्फत अधिकृतपणे आपल्या जमिनीची मोजणी करून घेतली होती. मात्र जमिनीच्या जुन्या निजामकालीन अभिलेखांमध्ये क्षेत्र कमी असल्याचे ▶▶ पान २ वर

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०